नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०२/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील वडम्बा शिवार येथे दिनांक ०१/०९/२२ चे ०७.३० वा. सुमारास अनोळखी वेळसर पुरूष वय अंदाजे ५५ वर्ष हा जबलपुर ते नागपुर हायवे रोड ने पायदळ जात असता जबलपुर कडुन नागपुर कडे जाणा–या आरोपी अनोळखी ट्रक चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सदर वेळसर अनोळखी पुरूषाला जबर धडक दिल्सी. या अपघातात अनोळखी पुरूश हा रोडचे खाली पडल्याने त्याचे डोक्याल्या जबर मार लागला व जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक संदीप नागोसे पो स्टे देवलापार यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक विजय बिसन मो.क्रं ८७८८१५४१६० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा चमेली बस स्टॉप येथे दिनांक ०१/०९/२२ चे १९. ०० वा. सुमारास फिर्यादीचा भाउ वासुदेव पांडुरंगजी वाघाडे(मृतक), वय ३५ वर्ष रा.चमेली हा कामावरुन घरी परत येत असतांना चमेली बस स्टॉप जवळ नागपुर जाणारे लेन वर अमरावती कडुन नागपुर कडे जाणारा अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाला समोरा–समोर धडक मारुन गंभीर जखमी करुन त्याचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विलास पांडुरंगजी वाघाडे वय ३५ वर्ष रा.चमेली ता काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सोनावले ९६७३५२६१७७ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील मौजा गोंडखैरी शिवार चोकरधानी हॉटेल समोर येथे दिनांक ०१/०९/२२ चे २१.२४ वा. सुमारास आरोपी नामे– पोचुल बापुराव शिंदे, वय २८ वर्ष, रा.गंगानगर हनुमान मंदिर जवळ काटोल रोड नागपुर हा त्याची एनएच– ३१/बीआर– ४६७४ क्रमांकाच्या सिडी डॉन मोटर सायकल ने त्याची पत्नी सौ. प्रिती पोचुल शिंदे(मृतक), वय २२ वर्ष हिला घेवून डबल सिट गोंडखैरी येथून नागपुरला घरी परत जात होता. त्यादरम्यान अमरावती रोड ते नागपुर रोडवर आरोपीच्या चालत्या मोटरसायकलच्या चाकात प्रिती शिंदे हिचा साडीचा पदर अडकल्याने ति गाडीवरून खाली पडली. या अपघातात तिचे डोक्याला गंभीर मार लागून जखमी झाल्याने तिला उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे ट्रामा कॉप्युलटी येथे भरती केले होते उपचारा दरम्याण ती मरण पावली. पो.स्टे. कळमेश्वर ला. मर्ग क्र ७५/२२ कलम १७४ जा. फो. दाखल असल्याने चोकशी वरून असे निषपन्न झाले की, आरोपीने आपली मोटर सायकल भरधाव वेगाणे व हलगर्जी पनाणे चालवून मृतक हिचे मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा प्रकाश गुलाबराव उईके नेमणुक पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा प्रकाश उईके मो नं ९८२३३२४८२६ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कन्हान** – दिनांक ३१/०८/२०२२ चे २३.३० वा. ते दिनांक ०१/०९/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास पो.स्टे. कन्हान हद्दीत फिर्यादीची मुलगी वय १३ वर्ष ही जन्मापासुन मतीमंद आहे. ती घरीच राहत असुन तिच्याकडे लक्ष देण्याकरिता फिर्यादीची पत्नी ही घरीच राहत असते. परंतु फिर्यादीची आई ही आग्रा व मथुरा येथे दर्शना साठी गेली होती. दिनांक ३१/०८/२०२२ चे रोजी रात्री १०.३० वा. दरम्यान फिर्यादी हे घरी झोपले असता नंतर रात्री ११.३० वा. ते लघुशंके करीता उठले असता तेव्हा फिर्यादीची मुलगी ही जागी होती. नंतर सगळे झोपले असता दिनांक ०१/०९/२०२२ रोजी सकाळी ०६.०० वा. दरम्यान फिर्यादीची मुलगी ही दिसली नाही. तिचा शोध घेतला असता मिळुन न आल्याने तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री प्रमोद चौधरी मो.क्र. ९८२३२१७२०५ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०१ कि मी अंतरावरील मौजा बुटीबोरी सीडको कॉलनी बुटीबोरी येथे दिनांक ०७/०७/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अजय भैयामलाल गुप्ता, वय २२ वर्ष, रा. सीडको कॉलनी बुटीबोरी याचे स्टेट बॅक ऑफ इंडीया, जरी बजार, उत्तर प्रदेश येथे बॅक खाते असुन फिर्यादी हा घरी हजर असतांना त्याचे मोबाईल वर यातील अज्ञात अरोपीने फोन करून 'तुम्हे इनाम लगा है' अशी लालच देवनु ऑनलाइन लिंक पाठवुन त्याव्दारे ऑनलाईन पद्धतीने एकुण ४१,४८०/–रूपये काढुन घेत फिर्यादी ची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री भिमाजी पाटील मो.नं. हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**